# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमाक:२अ/एडीएम/जात वैधता/२०१८/६४१
दिनांक : 24 MAY 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंत प्रलंबित असलेल्या जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रुटीबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रवेशित उमेदवारांच्या प्रवेश यादया पडताळणी करून त्या प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्याबाबत आपल्या कार्यालयास प्राधिकृत करण्यात आले आहे.

तथापि शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंतच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रुटी आपल्या स्तरावरुन तपासून मान्यता देण्यात येत असते. मात्र आता पर्यंत किती विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली नाहीत याची संस्था/कोर्स /वर्ष निहाय प्रमाणे एकत्रित माहिती खालील विवरणपत्रात उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश SEAT Type- GOPENH / LOPENH / GPOENO / LOPENO /AI / INSTITUTE LEVEL/ TFWS अंतर्गत झाले आहेत मात्र जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही व सदर उमेदवार त्यांचा प्रवेश खुल्या प्रवर्गात करुन घेण्यास तयार आहेत अशा उमेदवारांचे एकत्रित संस्था निहाय वर्ष निहाय व कोर्स निहाय प्रस्ताव या संचालनालयास सादर करण्यात यावेत. जेणे करुन संबंधित प्रवेशित विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रुटीबाबत या संचालनालयास कार्यवाही करणे सुलभ होईल. परिणामी जात वैधता त्रुटीची प्रकरणे आपल्या कार्यालयामार्फत या संचालनालयास वेळोवेळी सादर केली जाणार नाहीत व अशा प्रकरणी सर्व समावेशन निर्णय घेऊन प्रकरण निकाली काढता येईल.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | महाविद्यालयांचे नाव | वर्ष | जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | वरिल प्रमाणे खुल्या प्रवर्गात करावयाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

तरी उपरोक्त विवरणपत्रातील माहिती प्रथम प्राधान्याने desk2a@dtemaharashtra.gov.in या ई मेल आय डी वर दिनांक ३०.०५.२०१८ पर्यंत सादर करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

**तात्काळ/प्रथम प्राध्यान्य**

पृष्ठांकन क्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/१८३
दिनांक :- 29 MAY 2018

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या विना-अनुदानित पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था यांना सुचित करण्यात येते की,शैक्षणिक वर्ष २०१२ -२०१३ पासून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंत प्रलंबित असलेल्या जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रुटीबाबत अध्याप पुर्तता केलेली नाही त्यांची माहिती संदर्भीय पत्रात दिलेल्या विवरणपत्रात भरुन दि.२९/०५/२०१८ पर्यंत सादर करावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद. 29/05

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की,सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.